**विषय :-** माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळणेबाबत.

**संदर्भ :-** आपला ऑनलाईन माहिती अधिकार अर्ज क्र. UDDEP/R/२०२६/ ६२२६१, दि.१२.०८.२०२६.

**महोदय,**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये आपला संदर्भाधिन अर्ज या कार्यासनास प्राप्त झाला आहे. सदर अर्जान्वये आपण खालील माहितीची मागणी केली आहे.

सद्यस्थितीत सहाय्यक नगररचनाकार श्रेणी-१,गट-ब, या पदांची रिक्त पदसंख्या कळवावी. व पदे रिक्त असतील तर त्याबद्दलची भरती प्रक्रिया चालू आहे का आणि भरती प्रक्रिया चालू असेल तर त्याबद्दलचे मागणी पत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला पाठवले आहे का?

२. उपरोक्त प्रमाणे मागणी केलेल्या माहितीच्या अनुधंगाने कळविण्यात येते की, सहायक नगर रचनाकार, श्रेणी - १, गट-ब संवर्गाचे सद्यस्थितीत २५५ पदे रिक्त असून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची जाहिरात क्र. ०५१/२०२४ च्या शिफारस यादीनुसार १४० सहायक नगर रचनाकार यांना नियुक्ती देण्याची प्रक्रिया शासन स्तरावर सुरू आहे. तसेच सहायक नगर रचनाकार, श्रेणी - १, गट-ब संवर्गाच्या भरतीच्या अनुधंगाने आपणास कळविण्यात येते की, सदर संवर्गाकरिता मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठविण्याकरिता नस्ती शासनस्तरावर विचाराधीन असून अद्याप कार्यवाही पूर्ण झालेली नाही.

३. सदर माहितीने आपले समाधान न झाल्यास, आपणास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ खाली श्री. सु. ना. शिंदे, प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव (नवि-२७), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांच्याकडे ३० दिवसांचे आत अपिल दाखल करता येईल.

**आपला**

**(देबानंद महाजन)**
**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**